Literacy for a Billion

Movie: Mohityanchi Manjula
Year: 1960

Song: Valakha Majh Human
Lyricist:

पांढरा कावळा काळा बगळा
पांढरा कावळा काळा बगळा
पांढरा कावळा काळा बगळा
हातात गावलाय परान
आरं हातात गावलाय परान
बसंल कसं गप गुमान
बसंल कसं गप गुमान
दादानू वळखा माझं हुमान
वळखा माझं हुमान
ए वळखा माझं हुमान होय

आवं खाली फांद्या वरती मुळी
न् आली फुलाच्या मागनं कळी
खाली फांद्या वरती मुळी
आली फुलाच्या मागनं कळी
खाली फांद्या वरती मुळी
आली फुलाच्या मागनं कळी
बिन बियाचं झाड लावूनी
लपून बसला माळी
बिन बियाचं झाड लावूनी
लपून बसला माळी
आवं डोस्क्यानं चालतोय
आवं डोस्क्यानं चालतोय
न् डोळ्यानं बोलतोय
दिव्याला लागतंय गिरान
दिव्याला लागतंय गिरान
बसला कसं गप गुमान

बसला कसं गप गुमान
दादानू वळखा माझं हुमान
वळखा माझं हुमान
वळखा माझं हुमान हो

नाव देवऋषी माझं खरं
हात दावतो मी तुमच्या म्होरं
नाव देवऋषी माझं खरं
हात दावतो मी तुमच्या म्होरं
साडेसातीचा हिशेब सांगा
किती बायका किती पोरं
दात्याला देणगी
दात्याला देणगी
कुणब्याला कलंगी
गुरूच मागतोय गिन्यान
आरं गुरूच मागतोय गिन्यान
बसला कसं गप गुमान
बसला कसं गप गुमान
दादानू वळखा माझं हुमान
वळखा माझं हुमान
वळखा माझं हुमान
हार कुणाची जीत कुणाची
गुपीत यातलं जाण हे हे हे...
बसला कसं गप गुमान
अहो बसला कसं गप गुमान
दादानू वळखा माझं हुमान
वळखा माझं हुमान

Literacy for a Billion

वळखा माझं हुमान
वळखा माझं हुमान
वळखा माझं हुमान
वळखा माझं हुमान हो

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*